


॥श्री॥

# श्रीनारद – भक्तिसूत्रे

उपोद्घात - काही भाग -

भक्ती हे एक परिपूर्ण शास्त्र आहे हे अनेक उपासक लक्षात घेत नाहीत. त्यांच्या मताने त्यांना झेपेल व जशी जमेल तशी उपासना ते करतात. त्यामुळे उपासनेचे रूपांतर भक्तीत होऊन त्यापासून मिळणारा आनंद दूर राहतो. निर्भयता, तृप्ती, शांती इत्यादींचा अनुभव येत नाही. ह्यामुळे उपासनेला बहुतेक वेळा यांत्रिक कृतीचे किंवा कर्मकांडाचे स्वरूप येते. श्रवणापासून सुरू झालेल्या उपासनेची, आत्मनिवेदनरुप भक्तीत जाणीवपूर्वक परिणती झाली पाहिजे असा सहसा कोणाचाच आग्रह नसतो. भावना व प्रेम हे दोन भक्तीचे आधार असून त्यांना शास्त्राच्या चौकटीत कोंडून ठेवणे व त्यातील अकृत्रिमपणा गमावून बसणे काहींना रुचत नाही. अशा तऱ्हेची विधाने ऐकली किंवा वाचली तर प्रामाणिक साधक सुद्धा भक्तिशास्त्राकडे दुर्लक्ष करू शकतो.

'माझे देवावर प्रेम आहे' असे वाटणे व प्रत्यक्ष प्रेम असणे ह्यांत फार फार तफावत असू शकते. भक्तिशास्त्रात सांगितलेल्या प्रेमाच्या निकषांवर स्वतःचे प्रेम घासून घ्यावयास नको का? देवावर सामान्य श्रद्धा असणे एवढे तोटके भांडवल भक्तीला पुरत नाही. सामान्य श्रद्धा, प्रेम, निष्ठा, अनन्यता, शरणागती व ऐक्य असा प्रवास व्हावा लागतो. त्यासाठी उपासकाला दृष्य जगतातील अनावश्यक भावनिक गुंतवणूक काढून घ्यावी लागते. हे साधण्यासाठी भक्तीशास्त्र मार्गदर्शन करते. प्रारब्ध हि जीवसृष्टीचे नियमन करणारी ईश्वरी योजना किंवा व्यवस्था आहे. त्यानुसार जीवन जगत असता सुखदुखाःचे द्वंद्व अनिवारपणे जीवावर येऊन आदळते. हे प्रहार नगण्य करण्याचे सामर्थ्य अस्सल भक्तीत आहे. ते भक्तीशास्त्राच्या अभ्यासाशिवाय कमाविता येत नाही.
नारायणाचा अखंड जप प्रसन्न चित्ताने करणारे नारद, महान भक्त आहेत. कोणाही सामान्य माणसाप्रमाणे विषय-भोगांकडे मधून मधून प्रवृत्त होऊनही ते भक्तीपासून ढळले नाहीत. ही त्यांची प्रवृत्तीही लोकशिक्षणासाठीच आहे.
या ग्रंथात श्रीनारदांच्या भक्तिसूत्रांचा शास्त्रदृष्टीने थोडक्यात विचार करून साधक दृष्टीने अधिक विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. शक्यतोवर अधिक विस्तार टाळून ग्रंथ सुटसुटीत करण्यावर भर दिला आहे. घाईगर्दीच्या जगात हे आवश्यक आहे असे गृहीत धरले आहे. भगवान श्रीविष्णू व श्रीनारद आमच्यावर कृपा करोत ही प्रार्थना.

डॉ. श्रीकृष्ण द. देशमुख

## श्रीनारदभक्तीसूत्रे - शास्त्रीय मीमांसा (काही भाग)

भावनांच्या कल्लोळाला विचारांच्या मार्गाने भगवंतापर्यंत नेऊन तो कल्लोळ भगवंतामध्ये विलीन होणे, हे भक्तीचे स्वरूप आहे. त्या प्रवाहातून जीवभाव आत्मभावात विसर्जित व्हावा. भगवद्भाव व आत्मभाव एकच आहेत हे विचाराने निश्चित झालेले असावे. आपले कर्तव्यकर्म चोख पार पाडीत असता जीवनात जे जे घडेल, ते ते ईश्वरी योजनेनुसार घडेल अशा विश्वासाने शांत चित्ताने राहणे हे

शरणागतीचे स्वरूप आहे. अशी शरणागती असेल तर मत्सर, स्पर्धा, तुलना, द्वेष, इत्यादी विकार आपोआप दूर राहून समाधान टिकून राहते. नाम किंवा अन्य साधनेचे अनुसंधान सुटत नाही.

---- ह्याप्रमाणे भगवान, आदित्य, विष्णू मिळून एक दैवत समोर आले. त्याच भक्त भागवत किंवा वैष्णव झाले. पुढे 'मी' व 'विष्णू' यांचे नाते काय असावे किंवा आहे याची जिज्ञासा निर्माण झाली. जगत्, जगत् कर्ता व 'मी' यांचा संबंध काय आहे त्याविषयीही मोठे कुतूहल निर्माण झाले. या दोन्हींतून ऋषींच्या विचारांना अपूर्व धार आली. त्यातून उपनिषदे उदयाला आली. त्यात असा निष्कर्ष निघाला की, जीवरूप 'मी' मूळचा ब्रह्मरूपच आहे पण अविद्येच्या प्रभावामुळे 'मी'रूप जीवाला स्वतःच्या मूळ स्वरूपाचे विस्मरण झाले. भक्तीच्या भाषेत 'मी' मूळचा विष्णुरूप असून त्याचे विष्णुच्या मायाशक्तीमुळे विस्मरण झाले. ज्याचे विस्मरण झाले त्याचे अखंड स्मरण करून पुन्हा त्याच्याशी एकरूप होणे (आत्मनिवेदन भक्ती) हेच 'भक्ती' या साधनाचे खरे स्वरूप आहे. त्या तश्या स्मरणासाठी विष्णुवरील अपार प्रेम हे माध्यम पुढे आले.

सूत्रे (काही भाग)

सूत्र १,२ - अशा अद्भुत चरित्रांची पारायणे, कथा सांगणे, ऐकणे व त्याने संतुष्ट होऊन त्यांतच रमणे इत्यादिकांनी भगवद्प्रेमाला एक अपूर्व गंभीरता प्राप्त होऊन प्रेम हा साधकाचा स्थायीभाव बनून राहतो. यालाच किर्तनादी पाच भक्तींची साथ मिळाली असता क्रमाने दास्य, सख्य व आत्मनिवेदनापर्यंत झेप घेता येते. श्रीविष्णुला शरण राहिल्यामुळे त्याने जसे ठेविले असेल ते स्वागतार्ह वाटते व त्याचेकडून कशाचीही अपेक्षा केली जात नाही. अपेक्षा हा प्रेमामधील मोठाच अडसर आहे. 'शरणागती' हा शब्द उपासकाने फार चांगला समजवून घेतला पाहिजे. जीवनात आपापले कर्तव्य चोखपणे, सर्व कौशल्य पणाला लावून, संबंधीत ज्ञानाचा पूर्ण उपयोग करून व चुकारपणा न करता सावधपणाने करीत असताना जे जे घडेल ते ते शांतपणे व आनंदाने स्वीकारणे हे त्या शरणागतीचे मुख्य लक्षण आहे. जीवनाच्या उत्तरार्धात तर 'कर्तव्याचा प्रपंच' व 'प्रेमाची उपासना' अशी वाटणी झालेली असलीच पाहिजे. या वाटणीलाच आता वानप्रस्थाश्रमाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. उत्तरार्धातील उत्तरार्धात प्रापंचिक विचाराचा संपूर्ण त्याग करून केवळ देहनिर्वाह सांभाळीत प्रेममय भक्तीचे जीवन जगणे हाच भक्तीच्या संदर्भातील संन्यासाश्रम होय. ( येथे सर्वसाधारणपणे ७५ वर्षांचे आयुष्य गृहीत धरले आहे. )

सूत्र ३, ४ - तृप्ती हा माणसाचा मोठा अलंकार आहे. अतृप्तीतून अशांती व दुःख निर्माण होऊन पुढील जन्माच्या वासनेची बीजे तयार होतात. तृप्ती म्हणजे अल्पसंतुष्टता नव्हे. आपले कर्तव्य सर्वस्व ओतून करीत असता जे फळ मिळते त्यातील समाधान हे तृप्तीच स्वरूप आहे. जे नाही त्याची अनिवार ओढ नसणे म्हणजे तृप्ती.

सूत्र ५ - भक्तीचे हे परिणाम पाहिले की कित्येकांना प्रामाणिकपणे असे वाटते की ह्या प्रकारचे जीवन उत्साही व आनंदी असेल का? ते निरस, एकसुरी, बेचव, भाबडे व कंटाळवाणे होईल का? असे प्रश्न मनात येण्याचे मुख्य कारण म्हणजे 'यत्प्राप्य' ह्या सूत्रातील पदाचा पुरेसा विचार केलेला नसतो. 'यत्प्राप्य' म्हणजे ज्याची प्राप्ती झाली असता, ज्याच्याशी अखंड ऐक्य साधले असता, सायुज्य मुक्ती सिद्ध झाली असता. हा 'जो' कोण? तर सगुण-निर्गुण उभयात्मक परमात्मा. भक्तीची भाषा सगुणाची तर ज्ञानाची निर्गुणाची आहे. सगुणाचे आलंबन ही एक व्यवस्था आहे. हे एकदा पटले की सगुणनिर्गुणाचे द्वंद्व नष्ट होऊन साधक संशयरहित होतो. 'सगुण' हे प्रेमाने पाहणे, ऐकणे इत्यादी प्रकारे भोगावयाचे आणि त्याच्या साहाय्याने 'निर्गुण', ज्ञानेंद्रिये व मनावाचून अनुभवायचे. 'निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे', 'सगुणाचेनी आधारे निर्गुण पाविजे निर्धारे', 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे', इ. सर्व संतवचने सगुण निर्गुण एकमेकांना

पूरक आहेत व पर्यायाने एकच आहेत असे सांगतात. म्हणून प्रामाणिक उपासकाने जराही बुद्धिभेद होऊ न देता दोन्हींकडे समदृष्टीने पाहत आपली मोक्षाकडील किंवा भक्तीकडील वाटचाल वेगाने चालू ठेवावी.
'भगवंताची प्राप्ती' ह्या शब्दांचाच आनंदाची व प्रेममयत्वाची प्राप्ती असा अर्थ होतो. ज्याला निर्गुणाच्या संदर्भात 'आनंद' म्हणतात , त्यालाच सगुणाच्या दृष्टीने 'प्रेम' म्हणतात. प्रेम व आनंद दोन्ही एकच. आनंद विषयनिरपेक्ष असतो तर प्रेम श्रीकृष्ण सापेक्ष असते. श्रीकृष्ण आनंदाचा कंद असल्याने तोही विषयनिरपेक्ष आनंदरूप आहे. येथे खरे तर वादाला किंवा शंकेला जागाच नाही. अशा ह्या प्रेमानंदाने तृप्त झालेल्या भक्ताला कशाचीही आकांक्षा राहत नाही. आकांक्षा नेहमी अतृप्तीतून येते. पारमार्थिक तृप्ती प्राप्त झाल्यावर आकांक्षांचे कारणच काय? ह्याच ठिकाणी सामाजिक विचारवंतांकडून माणसाच्या महत्त्वाकांक्षेचे पंख छाटले जाण्याची भाषा वापरली जाते. त्यांनी एक गृहीत धरले आहे की आकांक्षेवाचून उत्साहाने कर्म केले जाणे शक्य नाही. येथेच त्यांची मोठी फसगत होते. आकांक्षा फळाची असते. फळ तृप्ती साठी असते. फळासाठी कर्म केले जाते. तृप्ताला फळाची आकांक्षा नसली तरी कर्माची नसते असे कोणी सांगितले? प्रारब्ध जीवाला कर्मरूपाने जखडून टाकते, ते त्याच्याकडून कर्म करून घेणारच. शिवाय भगवंताचा भक्त, त्याची आज्ञा आहे म्हणून आपले कर्म उत्कृष्ट रीतीने करीत राहणारच! त्या कर्माला जे फळ यावयाचे ते तथाकथित महत्त्वाकांक्षेवाचून सुद्धा तेच व तितकेच येईल. व्यक्ती, कुटुंब व समाज ह्यांचे नुकसान होणार नाही. तेव्हा समाजवादी विचारवंतांनी घाबरण्याची मुळीच गरज नाही.

---- स्मृती होणे व शोक होणे ह्यात फार फरक आहे. स्मृती हा बुद्धीचा एक धर्म आहे. ती तिचे काम करीत राहणारच. पण विवेकाने सुसंस्कृत झालेली बुद्धी, स्मृतीचे रूपांतर शोकात होऊ देत नाही. सर्व स्मृती श्रीकृष्णाशी निगडित राहिल्याने शोकाचा स्पर्श होत नाही. होऊन गेलेल्या घटनेतील प्रतिकूलाचे भय हे शोकाचे एक अंग असून संभाव्य घटनेतील प्रतिकूलतेचे भय हे आगामी शोकाचे दुसरे अंग आहे. एकूण शोकामध्ये भयाचा समावेश असतो. भयाच्या पोटात चिंता असते. चिंतेमुळे अशांती निर्माण होते. 'अशांतस्य कुतः सुखम्' असा प्रश्न गीता विचारते. 'अवघी चिंता वारली' असा अनुभव संत तुकोबा सांगतात.

---- श्रीकृष्णाशी अविभक्त असलेला भक्त दैनंदिन देहजीवन, कुटुंबजीवन व समाजजीवन यात रमून राहत नाही कारण तो कृष्ण-स्मरणाच्या स्थायीभावात रमलेला असतो. प्रारब्धवशात प्रसंगानुरुप वाट्याला आलेले अन्य भाव त्याला रमवू शकत नाही. अन्य भाव नाकारणे व त्यांत न रमणे ह्यांतील फरक लक्षात घ्यावा. विधिवत् संन्यास घेतल्यास ते नाकारावे लागतात. प्रेमलक्षणा भक्तीमध्ये श्रीकृष्णाच्या अनुसंधानाच्या पार्श्वसंगीतावर हे सर्व भाव स्वीकारले जातात. भक्तीवाद हा सुखदु:खांचा पराभव करून आनंदमय जीवनाची प्राप्ती करून देणारा पुरुषार्थवाद आहे.

***